**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

40

# समाज आणि राज्य प्रशासनात महिलांचा प्रभाव: अहिल्याबाई होळकर यांचे योगदान

**प्रा. अस्मिता शशिकांत हिंगोणेकर**
सहाय्यक प्राध्यापक (इतिहास विभाग)
वेस्ट खान्देश भगिनी सेवा मंडळ संचलित कला व वाणिज्य महिला महाविद्यालय देवपूर धुळे

---

**सारांश**

महाराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करताना करताना लोक कल्याणकारी राज्यकर्ता म्हणून अहिल्याबाई होळकर या मातोश्रींचे नाव प्रामुख्याने घेतले जाते.अहिल्याबाई होळकर या केवळ एका साम्राज्याच्या शासिका नव्हत्या, तर त्यांनी समाजसुधारणांमध्येही महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांनी न्याय, प्रशासन, धार्मिक सहिष्णुता, लोककल्याण आणि समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य केले. त्यांच्या राज्यकारभारात सामाजिक न्याय, स्त्री-सशक्तीकरण आणि सर्वसमावेशक प्रशासनाचा उत्तम समन्वय होता. बुरसटलेल्या पारंपारिक सतीच्या रुढी परंपरेला त्या गुण त्यांनी प्रजेच्या सुख शांतीसाठी एक उत्तम राज्यकर्ता व प्रशासक बनवून लोककल्याणकारी कार्य केले आहे .या संशोधन निबंधात त्यांच्या कार्याचा अभ्यास करून त्यांच्या दूरदृष्टीचा शोध घेतला आहे.

**प्रस्तावना:**

भारतीय इतिहासात काही महिला शासकांनी आपल्या कर्तृत्वाने अढळ स्थान मिळवले आहे. तसे रजिया सुलतान ,राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई फुले इत्यादी. अहिल्याबाई होळकर यांचे देखील महिला शासक म्हणून भारतीय इतिहासात अतुल्य असे कर्तुत्व आहे .अहिल्याबाई होळकर यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यांची कारकीर्द केवळ युद्धनीती किंवा राज्यव्यवस्थेपुरती मर्यादित नव्हती, तर त्यांनी सामाजिक न्याय, शिक्षण, धार्मिक सहिष्णुता आणि लोककल्याणाच्या क्षेत्रात क्रांतिकारी निर्णय घेतले. त्यांची कारकीर्द स्त्रीशक्तीच्या आणि आदर्श राज्यकारभाराच्या दृष्टीने एक प्रेरणादायी उदाहरण आहे. समतेच्या आधारवर राज्याची निर्मिती व न्यायव्यवस्था हे त्यांच्या प्रशासनाचे वैशिष्ट्य होते.त्याच्या हितासाठीच राज्याची निर्मिती केली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता.प्रजेचा संबंध आई पुत्राच्या संबंध प्रमाणे असतो हे त्यांनी त्यांच्या कृतीतून दाखवले आहे.

**अहिल्याबाई होळकर यांचे जीवन व पार्श्वभूमी:**

अहिल्याबाई होळकर यांचा जन्म इ.स. १७२५ मध्ये चौंडी (महाराष्ट्र) येथे झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे प्रतिष्ठित मराठा सरदार होते. माणकोजी शिंदे हे पुरोगामी विचाराचे होते. त्यांनी आपल्या मुलीला म्हणजेच अहिल्याबाईला आपल्या मुलांबरोबर शिक्षण दिले .मल्हारराव दांडपट्टा चालवणे ,तलवार चालवणे, कुऱ्हाड चालवणे ,काठी चालविणे, घोड्यावर उभे राहून घोड्याला वेगात पळवणे अशा युद्ध कला माणकोजींनी आपल्या कन्येला शिकविल्या. मल्हार राव होळकर यांनी त्यांच्या गुणवत्तेची दखल घेतली आणि त्यांचा विवाह आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्यासोबत केला.

**शासक म्हणून कार्य:**

कुंभेरीच्या लढाईचे नेतृत्व करत असताना खंडेराव हे युद्ध संचलन करीत होते.त्यावेळी शत्रूची गोळी लागून त्यांचा मृत्यू झाला .खंडेराव यांच्या मृत्यूनंतर मल्हारराव होळकर यांनी राज्यकारभार सांभाळला. त्यांच्यानंतर १७६७ मध्ये अहिल्याबाईंनी राज्याची सूत्रे स्वीकारली. बुरसटलेल्या सतीच्या प्रथेला झुगारून मल्हाररावांनी अहिल्याबाईंना वारसदार नेमले व ते म्हणाले, " आता माझा विर खंडेराव तूच आहेस ,त् तू राज्याच्या हितासाठी, राज्यात प्रजेच्या सुखासाठी जिवंत राहणे गरजेचे आहे."[1] अहिल्याबाईंनी मल्हार रावांना खऱ्या राजधर्माचे पालन करीन असे वचन दिले . त्यांनी प्रशासकीय सुधारणा केल्या आणि न्यायव्यवस्थेला बळकटी दिली. करप्रणाली पारदर्शक केली आणि शेतकऱ्यांना मदतीचे धोरण अवलंबले. तसेच त्यांनी एका आदर्श शासकाप्रमाणे न्यायप्रिय आणि सुशासनाची परंपरा पुढे नेली.

**लोककल्याणकारी धोरणे:**

महाराणी अहिल्याबाई राजदरबारात सरदारांना नेहमी स्वराज्य टिकवण्याचा मूलमंत्र देत असत, " पूर्वजांनी मिळवलेल्या स्वराज्य टिकविण्यासाठी माझा मृत्यू झाला तरी चालेल पण पेशव्यांचे कट कारस्थान चालू देणार नाही.लढाई आम्हाला नवीन नाही.मी अनेकदा पती वीर खंडेराव व सासरे महाराज मल्हार रावण सोबत लढाईत भाग घेतला आहे.लढाया लढले आहे.मला विश्वास आहे आमचे सरदार वीर लढवय्ये आहेत"[2]

©Copyright 2024 *ADRJ*. All Rights Reserved

**Akshardhara Research Journal**
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
**E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V**

• **शेतकरी आणि व्यापारी वर्गाची उन्नती**: करप्रणाली सोपी करून व्यापार आणि शेतीस चालना दिली. शेतकऱ्यांसाठी जलसंधारणाचे उपक्रम हाती घेतले.
• **बांधकाम कार्य**: गंगा, नर्मदा, गोदावरीच्या काठांवर घाट आणि मंदिरांची उभारणी केली. त्यांनी अनेक रस्ते, धर्मशाळा आणि पाणीपुरवठा यंत्रणा विकसित केली.
• **महिला सशक्तीकरण**: विधवा स्त्रियांसाठी आधार केंद्रे आणि मदतकार्य सुरू केले. स्त्रियांना आर्थिक मदत आणि उद्योग व्यवसायासाठी प्रोत्साहन दिले.
• **आरोग्य आणि शिक्षण**: धर्मशाळा, रुग्णालये आणि शाळांची उभारणी केली. आरोग्य सुविधांसाठी वैद्यकीय केंद्रांची स्थापना केली.
""'लोक मातेचा काळ आणि परिस्थिती पाहून कार्याची तुलना केली तर त्या काळी जगातील सर्वश्रेष्ठ, महाराणी म्हणून लोकमातेकडे पाहिले जाते.लोकमातेच्या जीवनात संसारिक सुख मिळाले नाही.स्वतःच्याच सुखात आनंद कधीही मानला नाही.तर प्रजेच्या सुखातच स्वतःचे सुख पाहिले आहे"[4]

**धार्मिक सहिष्णुता आणि सांस्कृतिक वारसा:**

अहिल्याबाई या केवळ कुशल शासकच नव्हे तर धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार करणाऱ्या राणी होत्या .अहिल्याबाई होळकर या स्वतः धार्मिक होत्या, परंतु त्यांचा दृष्टिकोन सर्वसमावेशक होता. त्यांनी हिंदू मंदिरांसह मशिदी आणि गुरुद्वारे यांचे संरक्षण केले. वाराणसी, गया, सोमनाथ आणि रामेश्वरम येथील मंदिरे त्यांनी पुन्हा बांधली. त्यांच्या राज्यात धार्मिक एकता आणि सौहार्द यावर विशेष भर दिला जात असे.अस्पृश्यता दूर करण्यासाठी आणि सर्वांना समान धार्मिक अधिकार मिळावेत यासाठी प्रयत्न केले.त्यांनी विधवांना आश्रय दिला आणि त्यांचे पुनर्वसन केले.अहिल्याबाईंनी धार्मिक कर्मकांडांपेक्षा समाजाच्या कल्याणावर भर दिला.अहिल्याबाईंनी त्यांच्या दरबारात कोणत्याही धर्मावर अन्याय होऊ दिला नाही. त्यांनी सर्व धर्मांच्या संत, महंत आणि मौलवींना समान सन्मान दिला. त्यांच्या दरबारात हिंदू आणि मुस्लिम दोघेही उच्च पदांवर कार्यरत होते.अहिल्याबाईंनी केवळ हिंदू मंदिरांचे संरक्षण केले नाही, तर मशिदी आणि गुरुद्वाऱ्यांच्याही पुनर्बांधणीसाठी मदत केली. त्यांचे काही महत्त्वाचे धार्मिक कार्य असे होते:

**काशी विश्वनाथ मंदिराचा जीर्णोद्धार** – बनारस (वाराणसी) येथील प्रसिद्ध काशी विश्वनाथ मंदिर त्यांनी पुन्हा बांधले.
**सोमनाथ मंदिराचा पुनर्विकास** – गुजरातमधील सोमनाथ मंदिर पुन्हा उभारण्यासाठी त्यांनी मदत केली.
**रामेश्वरम आणि गया येथे धार्मिक कार्य** – दक्षिण भारतातील रामेश्वरम आणि बिहारमधील गया येथे त्यांनी विविध धार्मिक कार्य केली.
**मशिदी आणि गुरुद्वाऱ्यांना मद**त – त्यांच्या राज्यात मुस्लिम आणि शीख धर्मीयांचे धार्मिक स्थळे सुरक्षित राहावीत यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

**युद्धकौशल्य आणि प्रशासन:**

अहिल्याबाईंनी कधीच अनावश्यक युद्धे केली नाहीत, पण त्यांनी आपल्या सैन्याला सदैव सक्षम ठेवले. प्रशासनात त्यांनी लोकशाही पद्धतीचा अवलंब केला आणि न्यायनिवाड्याकरिता खुल्या दरबाराची प्रथा सुरु केली. त्यांनी दारुगोळा व संरक्षणसामग्रीच्या पुरवठ्यावर विशेष लक्ष दिले, ज्यामुळे त्यांचे सैन्य सदैव लढण्यासाठी सक्षम राहिले. अहिल्याबाई विरुद्ध अनेक कटकारस्थाने सुरू करण्याचा प्रयत्न झाला. पेशवे राघोबा दादा आणि होळकरांचा दिवाणजी गंगाधरपंत चंद्रचूड यांनी होळकरांचे राज्य ओळखण्यासाठी कटकारस्थान केले परंतु महाराणी अहिल्याबाईंनी गंगाधर पंथाला खडसावून उत्तर दिले " मी ऐकोटी पडले, मी उघडी झाले, मला पाठबळ नाही मी बाई माणूस आहे. असे समजू नका, माझ्या रस्त्यात येऊ नका, माझ्या राज्यकारभारात आडवे येण्याचा प्रयत्न करू नका. मी जर मनात घेतले तर पेशवाई नेस्तनाबूत करेन."[3]

**आधुनिक काळातील महत्त्व:**

आधुनिक काळात स्त्रियांना स्वातंत्र्य व समता हे अधिकार मिळाले आहेत. आजची स्त्री ही राजकारणात देखील अग्रेसर आहे. भारताच्या सर्वोच्च पदी स्त्री ही कार्यरत झालेली आहे . भारताच्या राजकीय प्रवासात कार्य करण्यासाठी आजच्या स्त्रीला अहिल्याबाईंच्या राज्यकारभाराचा अभ्यास प्रशासन, लोककल्याणकारी धोरणे आणि स्त्री सशक्तीकरणाचा दृष्टिकोन हा वारसा मिळालेला आहे.त्यांच्या आदर्शांवर आधारित आधुनिक समाजसुधारणांची गरज आहे. त्यांचे लोकाभिमुख धोरण, न्यायप्रियता आणि सर्वसमावेशकता आजच्या प्रशासकांसाठी मार्गदर्शक ठरू शकते. प्रत्येक क्षेत्रात कार्य करण्यासाठी स्त्रीला जे नेतृत्व गुण हवे असतात ते गुण महाराणी अहिल्याबाई होळकर यांनी केलेल्या कार्यातून प्रत्येक स्त्रीला अंगीकारण्यासाठी मार्गदर्शक ठरतात. आज देखील प्रत्येक स्त्रीला अहिल्याबाई होळकर यांच्या कर्तुत्वाचे जाणीव करून देणे हे महत्त्वाचे आहे.

Akshardhara Research Journal
Single Blind Peer-Reviewed & Refereed International Research Journal
E ISSN -3048-8095 / February 2025 / Special Issue 1 Volume V

**निष्कर्ष**

१. अहिल्याबाई होळकर यांनी धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी मंदिरांची पुनर्बांधणी केली, विविध धार्मिक स्थळांची देखभाल केली, आणि धर्मनिरपेक्षतेची संकल्पना प्रसार केली. त्याचप्रमाणे, त्या आपल्या राज्यात विविध समुदायांना समान मान्यता देत होत्या.
२. अहिल्याबाई होळकर यांनी उत्कृष्ट प्रशासनाचे उदाहरण दिले. त्या न्या-याची महत्त्वाची भूमिका निभावत होत्या. न्याय व्यवस्थेतील सुधारणा आणि कुशल शासकीय व्यवस्थापन यासाठी त्यांचे कार्य आदर्श ठरते.
३. अहिल्याबाई होळकर यांना महिलांच्या शिक्षण व सशक्तीकरणावर विशेष लक्ष दिले. त्यांनी स्त्रीशक्तीला महत्त्व दिले आणि महिलांना अधिक सशक्त करण्यासाठी काही सामाजिक सुधारणाही केल्या.
४. अहिल्याबाई होळकर यांनी समाजातील विषमतांचे निराकरण करण्यासाठी अनेक उपक्रम राबवले. त्यांनी आपल्या राज्यात शांति, समता आणि परस्पर आदर वाढवण्यास महत्त्व दिले.
५. त्यांनी कला आणि साहित्य क्षेत्रालाही प्रोत्साहन दिले. अहिल्याबाई होळकर यांच्या दरबारात अनेक विद्वान आणि कवींचे योगदान होते, ज्यामुळे त्या काळातील संस्कृती आणि साहित्य समृद्ध झाले.

**समारोप**

अहिल्याबाई होळकर या केवळ एक शासिका नव्हत्या, तर त्या एक दूरदर्शी नेत्या, समाजसुधारक आणि न्यायप्रिय प्रशासक होत्या. त्यांच्या कार्यातून आदर्श नेतृत्वाचे आणि समाजहित साधण्याचे उत्तम उदाहरण मिळते. त्यांच्या निस्वार्थी कार्याचा आदर्श घेऊन प्रशासन, समाजसुधारणा आणि महिलांच्या प्रगतीच्या दृष्टीने पुढे जाणे आवश्यक आहे. आजच्या काळात त्यांच्या कार्याची आठवण ठेवून समाजाच्या उन्नतीसाठी त्यांचे विचार आत्मसात करणे आवश्यक आहे.अहिल्याबाई होळकर यांचे जीवन आणि कार्य एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक धारा म्हणून साक्षात आहे. त्यांचे कार्य धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रांमध्ये देखील अत्यंत प्रभावी ठरते. त्यांनी महिला सशक्तीकरण, समाज सुधारणा आणि धार्मिक सहिष्णुतेला प्रोत्साहन दिले, ज्यामुळे त्या काळात समता आणि शांततेचा विचार वृद्धिंगत झाला.त्यांच्या न्यायप्रियतेची आणि समजूतदार नेतृत्वाची साक्ष देणारी उदाहरणे आजही आपल्या समाजाला प्रेरित करत आहेत. अहिल्याबाई होळकर यांचे कार्य एक शाश्वत धरोहर म्हणून पिढ्यान् पिढ्या यांचे मार्गदर्शन करत राहील, ज्यामुळे त्यांच्या समर्पण आणि कर्तव्यदक्षतेचा आदर्श कायम राहील.

**संदर्भ सूची**

१. हारगीले तुकाराम, मानवतेच्या महामाया, प्रबोधन प्रकाशन ,नांदेड, प्रथम आवृत्ती:१४ एप्रिल २०१८, पृष्ठ क्र. २३
२. हारगीले तुकाराम, मानवतेच्या महामाया, प्रबोधन प्रकाशन ,नांदेड, प्रथम आवृत्ती:१४ एप्रिल २०१८, पृष्ठ क्र. २५
३. हारगीले तुकाराम, मानवतेच्या महामाया, प्रबोधन प्रकाशन ,नांदेड, प्रथम आवृत्ती:१४ एप्रिल २०१८ पृष्ठ क्र. २५
४. हारगीले तुकाराम, मानवतेच्या महामाया, प्रबोधन प्रकाशन ,नांदेड, प्रथम आवृत्ती:१४ एप्रिल २०१८, पृष्ठ क्र. २९
५. ठाकरे, एस. अहिल्याबाई होळकर आणि त्यांचे कार्य
६. जोशी, के.पी. भारतातील स्त्रीशक्तीचे योगदान
७. कुलकर्णी, आर.एम. भारतीय इतिहासातील स्त्री नेतृत्व